**प्रकल्प प्रवर्तक मे. श्री साईबाबा सॅण्ड ड्रेजिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, रत्न-सुनित, तळमजला, कोपर रस्ता, डोंबिवली (पश्चिम), जिल्हा-ठाणे – ४२१ २०१, महाराष्ट्र यांच्या पनवेल क्रिकजवळ, भूखंड क्रमांक ५८१, गाव- तरघर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील बहुउद्देशीय जेटीच्या प्रस्तावित बांधकाम प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त**

प्रकल्प प्रवर्तक मे. श्री साईबाबा सॅण्ड ड्रेजिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, रत्न-सुनित, तळमजला, कोपर रस्ता, डोंबिवली (पश्चिम), जिल्हा-ठाणे – ४२१ २०१, महाराष्ट्र यांच्या पनवेल क्रिकजवळ, भूखंड क्रमांक ५८१,गाव- तरघर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील बहुउद्देशीय जेटीच्या प्रस्तावित बांधकाम प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २० सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता अप्पर डेक बँक्वेट हॉल, टी-२५-३०, तिसरा मजला, सेंच्युरियन मॉल, सेक्टर-१९ ए, सी वूड, नेरुळ रस्ता, नवी मुंबई – ४०० ७०६, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रशांत भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१ तथा सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसूचनेनुसार संवर्ग ब ७ (ई) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (State Environment Impact Assessment Authority - SEIAA), पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन,

मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

सदस्य, आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २३-०८-२०२१ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक ०६-१२-२०२१ रोजी प्रदान केली. त्यानुसार प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प परिघाच्या १०.० कि.मी. परिघातील क्षेत्रात पर्यावरणीय सर्वेक्षण करुन पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल तयार केला.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. श्री साईबाबा सॅण्ड ड्रेजिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, रत्न-सुनित, तळमजला, कोपर रस्ता, डोंबिवली (पश्चिम), जिल्हा-ठाणे – ४२१ २०१, महाराष्ट्र यांचा पनवेल क्रिकजवळ, भूखंड क्रमांक ५८१,गाव- तरघर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील बहुउद्देशीय जेटीच्या प्रस्तावित बांधकाम प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक ०६-०८-२०२३ रोजी अर्ज प्राप्त झाला.

त्या अनुषंगाने सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी दिनांक ०१-०९-२०२३ अन्वये सदरहू प्रकल्पाची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया घेण्याचे आदेश या कार्यालयास दिले. सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र प्राधिकरण यांनी दिनांक ०४-०६-२०२४ रोजी शिफारस पत्र प्रदान केलेले आहे.

जिल्हाधिकारी, रायगड यांनी त्यांच्या पत्र दिनांक १६-०८-२०२४ नुसार सदरहू प्रकल्पास प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार , दिनांक २० सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित

अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-१५१/२०२४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२४०९०५-एफटीएस-०१५९, दिनांक ०५-०९-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी,रायगड,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी –<br>प्रादेशिक अधिकारी -रायगड,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>रायगड भवन, ६ वा मजला,<br>सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,<br>नवी मुंबई – ४१० २०१ | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>रायगड भवन, ६ वा मजला,<br>सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,<br>नवी मुंबई – ४१० २०१ | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत, दैनिक कृषिवल यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २०-०८-२०२४ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती.

त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ खालील अधिसूचित (notified) शासकीय कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड,अलिबाग,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड,अलिबाग,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,

५) प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय, पनवेल तालुका-पनवेल,जिल्हा – रायगड,

६) तहसीलदार, तहसील कार्यालय, तालुका-.पनवेल, जिल्हा- रायगड,

७) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड,

८) सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालये – मौजे – मोहा, मौजे – तरघर, मौजे – कोंबडभूजे, मौजे – गणेशपुरी, मौजे – वहाळ, मौजे – उलवे, तालुका- पनवेल, जिल्हा- रायगड.

९) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

१०) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

११) प्रादेशिक अधिकारी-रायगड, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१

१२) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१

१३) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,नवी मुंबई यांना ०१ सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येऊन सदरहू बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डीग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण,

बैठकीचे इतिवृत, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या मार्फत सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश दिले,

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की महाराष्ट्राला ७२०.० किलोमीटर लांबीची किनारपट्टी लाभलेली असूनही मुंबई बंदर आणि जवाहरलाल नेहरू बंदर (वाढवण), ही दोनच बंदरे वसलेली आहेत. हरित क्षेत्र बंदर धोरणांतर्गत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने सात बंदरे जरी ओळखली (identified) असली, तरी दिघी व जयगड ही दोनच बंदरे कार्यान्वित झालेली आहेत. भारत देश व महाराष्ट्र राज्य यांची बंदर क्षेत्रातील अपेक्षित वाढ आणि प्रत्यक्ष हाताळणी या आकडेवारीत बरीच तफावत असून आर्थिक विकासासाठी सदरहू बंदराचा प्रस्तावित कार्गो हाताळण्यासाठी विकास होणे ही काळाची गरज आहे. प्रस्तावित बहुउद्देशीय जेट्टी ही बल्क, ब्रेक बल्क, कंटेनर आणि इतर माल हाताळणीसाठी नियोजित असून त्याची क्षमता पहिल्या वर्षामध्ये १.५ लाख टन प्रति वर्षे, तर पुढील वर्षांमध्ये किमान १०.० लाख टन प्रति वर्ष असेल. सदरहू सुविधा टप्याटप्याने कार्यान्वित करण्यात येतील आणि प्रकल्पाचा पहिल्या टप्प्यासाठी खर्च अंदाजे ४.८ कोटी रुपये असेल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की CRZ अधिसूचना, जानेवारी, २०१९ व वेळोवेळी पारित केलेल्या सुधारणांनुसार, प्रस्तावित प्रकल्प हा किनारी भागात असल्याने त्यास CRZ मंजूरी प्राप्त करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशांनुसार सदरहू भूखंडावर ३३% हरितपट्टा विकसित करण्यात येईल. तसेच प्रस्तावित प्रकल्प भूखंडावर खारफुटी झाडे नाहित. प्रकल्प विकसित करताना कुठलेही खारफुटीचे झाड तोडण्यात येणार नाही.

प्रकल्प बांधकाम टप्प्यात सुमारे ५० कामगारांची आवश्यकता असून त्यासाठी स्थानिक व्यक्तींनाच प्राधान्य देण्यात येईल. तसेच प्रकल्प पूर्ण कार्यान्वित झाल्यानंतर कुशल, अर्धकुशल आणि अकुशल कामगारांना रोजगाराची संधि उपलब्ध होतील. प्रकल्प विकसित झाल्यने स्थानिक परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल. त्यामुळे स्थानिकांचे जीवनमान सुधारेल.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) <u>श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी,तेलंगणा राज्यः-</u>

माझ्या श्री साईबाबा सॅण्ड ड्रेजिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेडच्या व्यवस्थापनाला शुभेच्छा. भारतातील पर्यावरणवादी म्हणून माझ्या मते बेरोजगारी हेच देशातील मोठे प्रदूषण आहे. कोणतेही प्रदूषण म्हणजे पाणी, हवा, ध्वनी यावर आपण नियंत्रण ठेवू शकतो, पण बेरोजगारीची समस्या एका दिवसात सुटू शकत नाही. या संदर्भात, मी औद्योगिक विकासाला बिनशर्त पाठिंबा देतो.

त्याचबरोबर प्रकल्प व्यवस्थापनाने प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने सुचविलेल्या खबरदारीच्या उपाययोजनाही (precautionary measures) कराव्यात. कृपया त्याचप्रमाणे अनुसरण करा. त्यामुळे समाज आणि सरकारी कार्यालयांमध्ये प्रकल्पाविषयी आत्मविश्वास निर्माण होईल.

मी आपणास सुचवितो की, सामान्य झाडे लावण्याऐवजी फळ देणारी झाडे आणि औषधी झाडे लावणे व विकसित करणे यांना प्राधान्य देण्यात यावे. पर्यावरणाच्या संरक्षण आणि हवा प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी हे अत्यंत आवश्यक आणि उपयुक्त आहे.

तसेच, मी परिसरातील तरुणांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याची सूचना करत आहे. ज्या तरुण मुला-मुलींमध्ये जी काही रोजगार क्षमता आहे, त्यांना कृपया रोजगार द्या. कृपया CSR बजेट अंतर्गत सरकारच्या मदतीने कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यास सुरवात करा. कौशल्य विकास प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तीला, अशिक्षित बेरोजगार तरुणांना इतर ठिकाणी नोकरीची संधी देखील मिळू शकते.

म्हणून मी CSR बजेट खर्च करण्यासाठी आणि विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आजूबाजूच्या गावांसह एक समन्वय समिती स्थापन करण्याची सूचना करत आहे. त्यामुळे प्रकल्प व्यवस्थापनाला विश्वासार्हता देईल. कृपया जनतेस आवश्यक असलेल्या गरजांनुसार सामाजिक कामाला प्राधान्य द्या. तसेच पर्यावरणाचा समतोल राखा. त्याचबरोबर विकासकामांसाठी शासकीय कार्यालयांना सहकार्य करावे.

माझ्या मते, भारतात विविध साहित्यांची वाहतूक करताना,

जलमार्गाने वाहतूक केल्यास एक कोटी रुपयांची बचत होऊ शकते. रेल्वेने किंवा रस्त्याने वाहतुकीसाठी जास्त खर्च येतो. येथे मी प्रकल्प व्यवस्थापनाचे कौतुक करत असून MoEF आणि CC, भारत सरकारला फेमस ड्रेजिंग कॉर्पोरेशनला बिनशर्त परवानगी देण्याचे आवाहन करत आहे.

मी तपशीलवार EIA अहवाल दिल्याबद्दल प्रकल्प पर्यावरण सल्लागाराचे अभिनंदन करतो.

२) **<u>श्री मनोहर ओवळेकर, राहणार-तरघर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगडः-</u>**

मी स्थानिक रहिवाशी आहे. आमची जी शेती होती, ती शासनाने नवी मुंबई विमानतळासाठी आणि येथील विविध सामाजिक प्रकल्पासाठी अधिग्रहित केलेली आहे. आमची सर्व शेती शासनाने अधिग्रहित केल्याने आमचे उपजिविकेचे साधन हिरावून घेण्यात आलेले आहे. त्यामुळे आम्हांला आणि येथील भूमीपुत्रांना रोजगाराची आवश्यकता आहे. तरी आम्हांला प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी. प्रकल्पास आमचा पाठिंबा आहे.

३) **<u>श्री श्रीराम पाटील, राहणार-मोरावे गाव, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगडः-</u>**

आमचीपण शेती रेल्वेसाठी सिडकोने अधिग्रहित करण्यात आलेली आहे. तरी आम्हांलाही उपजिविकेसाठी छोटा-मोठा व्यवसाय किंवा बोट दुरुस्ती व्यवसाय मिळावा ही आमची मागणी आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

मा. अध्यक्षांच्या संमतीने बैठकीचा समारोप करताना सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि मा. अध्यक्ष यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेल्या ५८ लेखी सूचना सोबत जोडत आहोत.

**(प्रशांत भोसले),**
सदस्य, आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती,
तथा
उप प्रादेशिक अधिकारी ,रायगड१-
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन ,सीबीडी बेलापुर, नवी मुंबई,

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती,
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा - रायगड